# ५. एकदा गंमत झाली

वाऱ्याने झाडाची फांदी हालू लागली. खिडकीत बसलेली मनुली फांदीकडे बघू लागली. वारा अंगावर झेलू लागली. गारगार वाऱ्याच्या झुळकेने मनुली सुखावली.

'काय छान वाटतंय, कुणीतरी गालावर अगदी मोरपीस फिरवल्यासारखं.' मनुली मनाशीच म्हणाली. तिने डोळ्यांची उघडझाप केली. पापणी मिटली. पापणी उघडली. तिला वाटलं, 'आज झाडाला कसलातरी आनंद झालाय. सगळी पानं वाऱ्यानं हालतायत. किती मज्जा ! गंमतच आहे. आपल्याला आनंद झाला, की आपण दोनच हातांनी टाळ्या वाजवतो. झाडं मात्र असंख्य पानांनी टाळ्या वाजवू लागतात.' मनुली होती दंग. तिला दिसला पतंग. तिला वाटलं, 'हा पतंग मला उचलून घेऊन गेला तर ! केवढं हे पिंपळाचं झाड आणि काय त्याचा पसारा. झाडाच्या उंचउंच शेंड्यांवर हिरवीगार टोकदार पानं.'



इतक्यात गंमत झाली. पिंपळाची दोन पानं तरंगत तरंगत खिडकीतून आत आली. मनुलीने ती अलगत उचलली. पानांकडे एकटक पाहू लागली. पानेही तिच्याकडे पाहत होती. मनुलीला काहीतरी सांगत होती. मनुलीला वाटले, 'गंमतच आहे ! मधे ही सरळरेषा आणि कडेनं आलेल्या ह्या लहान लहान रेषा, सगळ्या मधल्या रेषेला येऊन मिळतायत.' तिने पाने आपल्या पुस्तकात ठेवली. पुस्तक दप्तरात ठेवून ती शाळेत गेली.

बाई वर्गात आल्या. बाईंनी प्रथम नदीबद्दल माहिती सांगितली. नंतर नदीची कविता शिकवू लागल्या. 'एखाद्या डोंगरात नदीचा उगम होतो. ती वाहत वाहत डोंगरावरून खाली येते. डोंगरावरून येणारे छोटेछोटे प्रवाह तिला येऊन मिळतात. मग नदीचं पाणी आणखी वाढतं. नदी पुढेपुढे जाऊ लागते.'

बाई नदीबद्दल माहिती सांगत होत्या. शेवटी बाई म्हणाल्या, ''उद्या नदीचं चित्र काढून आणा.''

मनुली गप्पगप्प होती. तिच्या मनात आलं, 'कसं दिसत असेल हे सगळं. मी तर माझ्या गावाजवळची नदी बघते. ओढे, ओहोळ आणि पुढेपुढे वाहणारी नदी हे मला काहीच दिसत नाही. त्या डोंगरापासून चालायला सुरुवात करावी अन् लांबपर्यंत चालतच जावं, म्हणजे मला हे सारं दिसेल.'

वर्ग शांत होता. मनुली पटकन उठली. बाईंना म्हणाली, ''मी गमतीशीर चित्र काढलंय बाई ! अगदी डोंगरातल्या नदीचं, तिला येऊन मिळणाऱ्या ओढ्यांचं.''

''गमतीशीर ? दाखव बरं !'' बाई म्हणाल्या.

मनुलीने आपले पुस्तक उघडले. खिडकीतून उडत आलेली पाने तिने पुस्तकात ठेवलेली होतीच. गुपचूप बसली होती ती तिच्या पुस्तकात. तिने एक पान आपल्या हातात घेतले.

''अगं, चित्र दाखवतेस ना ?'' बाईंनी विचारले.

मनुली वर्गापुढे आली. तिने डाव्या हातात पान धरले होते.



बाई म्हणाल्या, ''हे तर पान आहे.''

मनुलीने डाव्या हाताच्या तळहातावर ते पान ठेवले. तळहात किंचित खोलगट केला. पानावरल्या मधल्या शिरेवर बोट ठेवून बाईंना म्हणाली, ''पाहा बाई, ही डोंगरातून आलेली नदी. पुढेपुढे चाललीय. बाजूच्या शिरा म्हणजे छोटेछोटे ओहोळ, ओढे तिला येऊन मिळतायत. नदी पुढेपुढे चाललीय. बाई ही नदी शहाणी नदी आहे. सरळ, ओळीत चाललीय. खरी नदी मात्र माझ्यासारखी कशीही धावते. ही पानं म्हणूनच मला मघाशी काहीतरी सांगत होती. तुम्ही नदीची माहिती सांगत होतात, तेव्हा मला ऐकू आलं त्यांचं बोलणं... पानांचं बोलणं.... गंमतच आहे नाही बाई !''

बाईंसह सगळा वर्ग मनुलीकडे फक्त स्तब्ध होऊन पाहत होता. बाई म्हणाल्या, ''खरंच मनुलीनं किती सोप्या शब्दांत नदीचं चित्र उभं केलं पाहा. मनुली तू छान कल्पना करतेस हं !''

**शब्दार्थ :** **असंख्य** – मोजता न येणारे, अगणित. **अलगत** – हळुवार, हळूच. **ओहोळ** – लहान ओढा. **स्तब्ध** – शांत.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) तुम्ही टाळ्या केव्हा वाजवता ?

(आ) नदीचे पाणी आणखी केव्हा वाढते ?

**प्र. २. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) झाडं मात्र ................ पानांनी टाळ्या वाजवू लागतात.

(आ) एखाद्या डोंगरात नदीचा ................ होतो.

**प्र. ३. कंसातील शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.**

(पुढेपुढे, छोटेछोटे, तरंगत तरंगत, गारगार, उंचउंच)

(अ) ................ वाऱ्याच्या झुळकेने मनुली सुखावली.

(आ) झाडाच्या ................ शेंड्यांवर हिरवीगार टोकदार पानं.

(इ) पिंपळाची दोन पानं ............ ............ खिडकीतून आत आली.

(ई) नदी ................ जाऊ लागते.

(उ) बाजूच्या शिरा म्हणजे ................ ओहोळ.

**प्र. ४. या पाठात एकच शब्द दोन वेळा वापरून काही शब्द आलेले आहेत, उदा., उंचउंच. असे आणखी शब्द सांगा.**

**प्र. ५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) सरळ × | (इ) पुढे × | (उ) शांत × |
| (आ) लांब × | (ई) लहान × | (ऊ) हसली × |

**प्र. ६. पाठात 'टोकदार' शब्द आलेला आहे. त्यासारखे शब्द बनवा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) रुबाब | (इ) धार | (उ) तजेल |
| (आ) समजूत | (ई) पाणी | (ऊ) चमक |

**प्र. ७. शिक्षकांच्या मदतीने अर्थ समजावून घ्या व लिहा.**

(अ) अलगत उचलणे.

(आ) एकटक पाहणे.

(इ) मोरपीस फिरवल्यासारखे वाटणे.

(ई) सुखावणे.

(उ) दंग असणे.

**प्र. ८. मनुली पानांकडे एकटक पाहू लागली, तसे तुम्हांला कोणकोणत्या गोष्टींकडे एकटक पाहावेसे वाटते ?**

**प्र. ९. पानावरच्या शिरा पाहून नदीबद्दल माहिती सांगण्याची कल्पना मनुलीला सुचली. तशी तुम्हांला नदीबद्दल माहिती सांगण्यासाठी कोणती कल्पना सुचते, ते सांगा.**

**उपक्रम :** शिक्षकांच्या मदतीने तुमच्या परिसरातील विविध झाडाझुडपांच्या पानांचे निरीक्षण करा. त्या पानांची चित्रे काढा किंवा पाने वहीत चिकटवा. कोणती पाने वहीत चिकटवणे शक्य आहे, कोणती पाने चिकटवता येत नाहीत, का ते लिहा. त्या पानांना दोन्ही बाजूंनी स्पर्श करा. हा स्पर्श हाताला कसा लागतो ते लिहा. उदा., साग – खरबरीत.